जावक क्रमांक 10121/२०२३
बंडगार्डन पोलीस स्टेशन पुणे
दिनांक २५.०८.२०२३

प्रति,

मा.जनसंपर्क अधिकारी सो पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर
यांना सविनय सादर

विषय- स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्दी मिळणे बाबत

रिपोर्ट – संदिप मधाळे, सहा.पोलीस निरीक्षक, बंडगार्डन पोलीस स्टेशन पुणे
यांज कडुन विनंती पूर्वक की,


महोदय,

वरील विषयान्वये सादर की, बंडगार्डन पोलीस स्टेशन अ.मयत रजि. नं. १४२/२०२३ सीआरपीसी १७४ मधील मयत इसम नामे एक अनोळखी पुरूष, वय- अंदाजे ४५ वर्षे, नाव-पत्ता माहीत नाही हा दिनांक १०/०८/२०२३ रोजी पुणे स्टेशन बीट मार्शलकरीता नेमणुकीस असलेले पोशि/१०२५३ मनिष संकपाळ यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान समोर फुटपाथवर आजारी अवस्थेत मिळुण आल्याने त्यास पुढील उपचारकामी खाजगी ॲम्ब्युलन्सने ससुन हॉस्पीटल येथे घेऊन गेले असता डॉक्टरांनी तपासणी करुन त्यास दिनांक १०/०८/२०२३ रोजी १८/०५ वा. उपचारापुर्वी मयत घोषीत केले असुन त्याचा एमएलसी १९७३७/२०२३ असा आहे. वरीलप्रमाणे खबर प्राप्त झाल्याने बंडगार्डन पोलीस ठाणे येथील पुणे स्टेशन चौकी अंमलदार म्हणुन कर्तव्यार असलेले पोलीस नाईक/७७८५ सुळ यांनी जाऊन वरीलप्रमाणे मयताचा पंचनामा केला. सदरचे मयत बॉडीस नक्की मरण कशाने आले आहे हे समजुन येत नसल्याने मयताचे नक्की कारण समजण्यासाठी मयत बाडीचे ससुन हॉस्पी. पुणे येथे MLPM No-4733/2023 अन्वये पोस्टमार्टम होवुन ॲडव्हान्स सर्टिफिकेट प्राप्त झाले असता त्यामध्ये मयताचे करणाचे कारण "Opinion preserved viscera preserved for histopathological examination" असे देवुन मयताचा व्हिसेरा राखुन ठेवला आहे. सदर मयताचे वर्णन खालील प्रमाणे

नाव- अनोळखी पुरुष, वय ४५ वर्षे, पत्ता माहीत नाही, शरीराने सडपातळ, चेहरा- उभट, केस- काळे व वाढलेले, दाढी मिशी वाढलेली व काळी, उंची- अंदाजे ५.६ फुट, वर्ण- काळा सावळा, उजवे हाताचे पोटरीवर नंदकिशोर असे गोंदलेले

तरी सदर बाबत स्थानिक वर्तमानपत्रात अनोळखी मयताचे नातेवाईकांचा शोध होणेकामी प्रसिद्धी होण्यास विनंती आहे.

टिपः- सोबत मयताचा फोटो जोडला आहे.




मा.सा.व्हावे

(संदिप मधाळे)
सहा. पोलीस निरीक्षक
बंडगार्डन पोलीस ठाणे, पुणे शहर